DAY — 13 SEAT NUMBER

| 2022 | III | 19 | 1500 | J-795 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# ECONOMICS (49)

Time : 3 Hrs. (7 Pages) Max. Marks : 80

***सूचना :*** *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*
*(२) आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके / आकृत्या काढा.*
*(३) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*
*(४) सर्व मुख्य प्रश्नांची उत्तरे नवीन पानांवर लिहावीत.*

**प्र. १. (अ) सहसंबंध पूर्ण करा :** (५) [२०]

(१) स्थूल अर्थशास्त्र : ☐ : : सूक्ष्म अर्थशास्त्र : किंमत सिद्धांत
(२) प्रत्यक्ष मागणी : अन्नधान्य व भ्रमणध्वनी : : ☐ : भूमी व श्रम
(३) संपूर्ण लवचिक मागणी : Ed = ∞ : : ☐ : Ed = 1
(४) उत्पादन पद्धत : मालसाठा पद्धत : : ☐ : घटक पद्धत
(५) वैयक्तिक उत्पन्न कर : ☐ : : वस्तू आणि सेवा कर (GST) : अप्रत्यक्ष कर

**(ब) आर्थिक पारिभाषिक शब्द लिहा :** (५)

(१) उपभोक्त्याकडून उपभोग घेतलेल्या वाढीव वस्तूपासून मिळालेली उपयोगिता.
(२) किंमत स्थिर असतांना इतर परिस्थितीतील बदलांमुळे मागणीत घट होते.
(३) प्रत्येक नगसंख्येच्या विक्रीनंतर मिळणारी प्राप्ती.
(४) असा कालावधी की, ज्यात उत्पादनाचे घटक आणि उत्पादनाचा खर्च बदलणे शक्य असते.
(५) दिलेल्या वर्षात देशाच्या भौगोलिक सीमारेषेच्या आत उत्पादित होणाऱ्या अंतिम वस्तू व सेवांचे बाजारभावानुसार येणारे मूल्य.

**(क)** खालील विधाने पूर्ण करा : (५)

(१) संपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र ------

(अ) सूक्ष्म अर्थशास्त्र (ब) स्थूल अर्थशास्त्र

(क) अर्थमिती (ड) नैसर्गिक अर्थशास्त्र

(२) किंमतीतील बदलापेक्षा जेव्हा मागणीतील बदलाचे प्रमाण कमी असते, तेव्हा असणारा मागणी वक्र ------

(अ) पसरट (ब) तीव्र उताराचा

(क) आयताकृती परिवलयाचा (ड) समांतर

(३) वस्तूची विक्री वाढविण्यासाठी करावा लागणारा खर्च ------

(अ) एकूण खर्च (ब) सरासरी खर्च

(क) सीमांत खर्च (ड) विक्री खर्च

(४) महसूली उत्पन्न आणि महसूली खर्चाचा समावेश असणारे अंदाजपत्रक ------

(अ) भांडवली अंदाजपत्रक (ब) शासकीय अंदाजपत्रक

(क) महसूली अंदाजपत्रक (ड) कौटुंबिक अंदाजपत्रक

(५) वस्तूची आयात करून त्यावर प्रक्रिया करून जेव्हा ती निर्यात केली जाते तेव्हा ------

(अ) पुनर्निर्यात व्यापार (ब) आयात व्यापार

(क) निर्यात व्यापार (ड) राष्ट्रीय व्यापार

**(ड)** विधाने व तर्क प्रश्न : (५)

(१) विधान (अ) : सीमांत उपयोगिता घटत जाते.

तर्क विधान (ब) : एकूण उपयोगिता घटत्या दराने वाढत जाते.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(२) विधान (अ) : किंमतीतील वाढ ही वस्तूचा पुरवठा कमी करते.

तर्क विधान (ब) : किंमत वाढली असता विक्रेत्याला जास्त नफा मिळतो.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(३) विधान (अ) : निर्देशांकाच्या रचनेत सर्व घटकांचा समावेश होतो.

तर्क विधान (ब) : निर्देशांक हा नमुन्यावर आधारित आहे.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(४) विधान (अ) : नाणेबाजारामुळे रोख रकमेचा वापर काटकसरीने होतो.

तर्क विधान (ब) : नाणेबाजार पैशाचे जवळचे पर्याय असलेल्या वित्तीय साधनांशी संबंधित नाही.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(५) विधान (अ) : आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे श्रमविभागणी व विशेषीकरणाला चालना मिळते.

तर्क विधान (ब) : भारताचा राष्ट्रीय व्यापार वाढत नाही.

पर्याय :

(अ) विधान 'अ' सत्य आहे पण तर्कविधान 'ब' असत्य आहे.

(ब) विधान 'अ' असत्य आहे पण तर्कविधान 'ब' सत्य आहे.

(क) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे 'अ' विधानाचे बरोबर स्पष्टीकरण करते.

(ड) दोन्ही विधाने सत्य असून 'ब' विधान हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

प्र. २. (अ) खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा (कोणतेही तीन) : [१२] (६)

(१) आशाने एका विशिष्ट उद्योगातील वैयक्तिक उत्पन्नाची माहिती गोळा केली.

(२) मीठाच्या किंमतीमध्ये १०% नी वाढ झाली तरी रमेशने मीठाच्या मागणीत कोणताही बदल केला नाही.

(३) ४००० कि. ग्रॅ. तांदूळ उत्पादनापैकी शेतकऱ्याने ₹ ४० दर असताना १००० कि. ग्रॅ. तांदूळ बाजारपेठेत विक्रीस आणला.

(४) शोभाने देशातील सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील सर्व अंतिम वस्तू व सेवांच्या आर्थिक मूल्यासंबंधी माहिती गोळा केली.

(५) ल्यूसीने एक वर्ष कालावधीसाठी ₹ १ लाख बँक ऑफ इंडियाच्या शाखेत एक रकमी भरणा केला.

(ब) फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : (६)

(१) विभाजन पद्धत आणि राशी पद्धत

(२) संमिश्र (पूरक) मागणी आणि स्पर्धात्मक मागणी

(३) एकूण प्राप्ती आणि सीमांत प्राप्ती

(४) किंमत निर्देशांक आणि संख्यात्मक निर्देशांक

(५) अंतर्गत कर्ज आणि बाह्य कर्ज

**प्र. ३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **[१२]**

(१) स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करा.

(२) मक्तेदारीची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(३) उपयोगितेची कोणतीही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(४) राष्ट्रीय उत्पन्न मापनातील कोणत्याही चार व्यावहारिक अडचणी स्पष्ट करा.

(५) मागणीची किंमत लवचिकता मोजण्याची गुणोत्तर पद्धती स्पष्ट करा.

**प्र. ४. खालील विधानांशी आपण सहमत आहात की नाही ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही तीन) :** **[१२]**

(१) घटत्या सीमांत उपयोगितेच्या सिद्धान्ताला कोणतेही अपवाद नाहीत.

(२) श्रमाचा पुरवठा वक्र मागे वळणारा असतो.

(३) पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेत वस्तूची किंमत, मागणी व पुरवठ्याच्या संतुलनावरून ठरते.

(४) भारतात भांडवली बाजार महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

(५) व्यवहारतोल आणि व्यापारतोल या दोन्ही संकल्पना सारख्याच आहेत.

**प्र. ५. खालील तक्ता, आकृती, उतारा अभ्यासून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**

(i)


| घटक | रक्कम (कोटी ₹) |
|---|---|
| उपभोग (C) | ८०० |
| गुंतवणूक (I) | ७०० |
| शासकीय खर्च (G) | ४०० |
| निव्वळ निर्यात (X–M) | –१५० |
| घसारा (D) | १०० |

(१) वरील तक्त्याच्या आधारे स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) काढा. (२)


(२) वरील तक्त्याच्या आधारे निव्वळ देशांतर्गत उत्पादन (NDP) काढा. (२)

(ii) खालील आकृत्यामधील मागणी वक्राची किंमत लवचिकता कोणती आहे ते ओळखा : (४)


(१)





(२)




(३)




(४)




(iii) बचत करणाऱ्यांना आणि गुंतवणूकदारांना एकत्र आणण्यासाठी व्यापारी बँका देशाच्या वित्तीय प्रणालीत मध्यस्थ म्हणून कार्य करतात. त्या नफा मिळविणाऱ्या आर्थिक संस्था आहेत. सन १९६९ च्या बँक राष्ट्रीयकरणामुळे शहरी व ग्रामीण भागात कर्जपुरवठा वाढला. शेती व किरकोळ व्यापारी वगैरे घटकांना कर्जे मिळू लागली. १९६९ पूर्वी वित्तपुरवठ्यापासून जे घटक वंचित होते त्यांना आता पुरेशी कर्जे मिळत आहेत. राष्ट्रीयकरणानंतर बँकाचा शाखा विस्तार झाला. बँकांनी आपल्या कार्यात विविधता आणली आहे. व्यापारी बँका लोकांना विविध प्रकारच्या सेवा पुरवित आहेत. उदा. सुरक्षित ठेव कप्पा, डीमॅट सुविधा, इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग इत्यादी.

(१) बँक राष्ट्रीयकरणाचे दोन फायदे सांगा. (१)

(२) बँका लोकांना पुरवित असलेल्या विविध सेवा लिहा. (१)

(३) वरील उताऱ्याविषयी आपले मत लिहा. (२)

**प्र. ६. सविस्तर उत्तरे लिहा (कोणतीही दोन) :** **[१६]**

(१) मागणीतील विचलन व मागणीतील बदल आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करा.

(२) निर्देशांकांचा अर्थ स्पष्ट करून निर्देशांक रचनेच्या पायऱ्या स्पष्ट करा.

(३) सार्वजनिक उत्पन्नाचे विविध स्रोत स्पष्ट करा.

◆◆◆